वर्ष १२ वे * अंक ३५ वा * गुरुवार, दिनांक ३० जानेवारी २०२५ ते बुधवार, दिनांक ०५ फेब्रुवारी २०२५ * रायगड * महाराष्ट्र * मुल्य २ रुपये * पृष्ठे४

अन्यायाला वाचा फोडणारे.... ज्वलंत एकमेव वृत्तपत्र.... रायगडसह मुंबई,नवीमुंबई मधून प्रकाशित...! शब्दांना लेखणीची धार..!
रायगड लोकधारा
संपादक: विजय चंद्रकांत गायकर RNI No. MAHMAR/2013/48622
बातम्या आणि जाहिरातीसाठी
संपर्क साधा :- ८३६९३९४३७२
सा.रायगड लोकधारा वृत्तपत्र / रायगड लोकधारा न्यूज चॅनल

अन्यायाला वाचा फोडणारे....
ज्वलंत एकमेव वृत्तपत्र....
रायगडसह मुंबई,नवी मुंबई मधून प्रकाशित...!
शब्दांना लेखणीची धार..!

# रायगड लोकधारा

RNI No. MAHMAR/2013/48622
संपादकः विजय चंद्रकांत गायकर

## उरणमधील तीन ग्रामपंचायतींमध्ये लाखोंचा गैरव्यवहार

### ग्रामविकास अधिकाऱ्यांवर पोलिसात गुन्हा दाखल



**सा.रायगडलोकधारा वृत्त/ उरण प्रतिनिधी :** तालुक्यातील तीन ग्रामपंचायतींमध्ये लाखो रुपयांच्या अपहारप्रकरणी ग्रामविकास अधिकारी वैभव पाटील यांच्याविरोधात उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांच्या तक्रारीनंतर उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उरण तालुक्यातील केगाव, बांधपाडा व चाणजे या तीन ग्रामपंचायतींमध्ये २२ जानेवारी २०१९ ते २६ एप्रिल २०२३ यादरम्यान वैभव पाटील ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत होते.या तीनही ग्रामपंचायतींमध्ये कार्यरत असताना वैभव पाटील यांनी बनावट कागदपत्रे, बिले, निधीचा विनियोग, नियमबाह्य खर्च, ग्रामपंचायतीची जमा झालेल्या रक्कम बँकेत भरणा न करणे, कामात मनमानी, हलगर्जीपणा करणे आदी गैरप्रकार केले असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे केलेल्या होत्या. याप्रकरणी चौकशी करून कारवाई करण्याची मागणीही अनेक तक्रारदारांनी गटविकास पान २ वर...

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा..!

### माजी सरपंच रमेश पाटील यांच्याकडून विद्यालयासाठी स्वच्छतागृह



**सा.रायगड लोकधारा वृत्त/ पनवेल प्रतिनिधी :** श्री भैरवदेव विद्यालय आणि लोकनेते श्री रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील एच एस सी आणि एसएससी विद्यार्थ्यांचा शुभचिंतन समारंभ रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी ह. भ. प. वैकुंठवासी शालुबाई सिताराम पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ माजी सरपंच रमेश पाटील यांनी विद्यालयासाठी ३ लाख २५ हजार रुपये खर्च करून उभारलेल्या स्वच्छतागृहाचेही उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय टी देशमुख, दुंदरे सरपंच सुभाष भोपी, माजी सरपंच रमेश पाटील, विद्यालयाचे स्थानिक स्कूल कमिटी सदस्य राजेश भोपी, बळीराम भोपी, वंदना भोपी, दीपक पाटील शांताराम चौधरी, विद्यालयाचे मुख्याध्यापक साळुंखे यांच्यासह विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यालयातील विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या तसेच मागील वर्षी इयत्ता दहावी आणि बारावी परीक्षेत पान २ वर...

## बारमधील मारहाणीत तरूणाचा मृत्यू



**सा.रायगड लोकधारा वृत्त/मुंबई प्रतिनिधी :** घाटकोपर येथील एका बारमधील व्यवस्थापक आणि वेटर यांनी केलेल्या मारहाणीत ४० वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. या मारहाणीत मृत व्यक्तीचे वडिलही जखमी झाले आहेत. याप्रकरणी पंतनगर पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून व्यवस्थापक व आठ वेटर्सना अटक केली आहे.किरण लालन (६१) आणि त्यांचा मुलगा हर्ष लालन (४०) कामानिमित्त घाटकोपर येथे गेले होते. 'हेडक्वार्टर बार व रेस्टॉरन्ट'चे मालक परिचयाचे असल्यामुळे त्यांना भेटण्यासाठी ते तेथे गेले. त्यावेळी हर्षने बारच्या व्यवस्थापकाकडे मालकाबद्दल विचारणा केली. त्यामुळे संतप्त झालेल्या व्यवस्थापकाने हर्षसोबत वाद घालण्यास सुरूवात केली. त्यानंतर व्यवस्थापक व तेथील सात-आठ वेटर्सनी हर्षला लाथा-बुक्याने मारहाण केली. यावेळी किरण लालन मुलाला वाचवण्यासाठी तेथे पान २ वर

## वार्षिक क्रीडा स्पर्धांचे प्रितम म्हात्रे यांच्याहस्ते उद्घाटन



**सा.रायगडलोकधारा वृत्त/पनवेल वार्ताहर :** महात्मा ज्योतिबा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते संपन्न झाले त्यांनी उपस्थित स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. आपण शिकलेल्या महाविद्यालयात प्रमुख पाहुणे म्हणून सन्मानाने बोलवले जाते. ही गोष्ट माझ्यासारख्या माजी विद्यार्थ्याला अभिमानाची वाटते. शिक्षकांनी दिलेली शिकवण आज नक्कीच सार्थकी लागली यात मला शंका नाही. असे प्रितम म्हात्रे यांनी सांगितले. यावेळी प्रितम म्हात्रे यांच्यासोबत गणेश ठाकूर (प्राचार्य) राजाराम पाटील (उपप्राचार्य) नरेश मढवी (मा. उपप्राचार्य) नामदेव पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून विद्यालयाला मिळणार अत्याधुनिक इंटरॅक्टिव्ह बोर्ड

## कर्मवीर विद्याप्रबोधिनी संचलित अनिवासी गुरुकुल प्रकल्पांतर्गत पारितोषिक वितरण समारंभ



**सा.रायगडलोकधारा वृत्त/पनवेल प्रतिनिधी :** रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण कोपर येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनी संचलित अनिवासी गुरुकुल प्रकल्पांतर्गत वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली व विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या समारंभात कला, शालेय क्रीडा, वक्तृत्व व नमो चषक क्रीडा व इतर विविध शालेय, विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि पुष्पगुच्छ देवून गौरविण्यात आले. यावेळी विद्यालयाचे उपशिक्षक रविंद्र भोईर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच या कार्यक्रमावेळी आय.डी.बी.आय. बँकेकडून विद्यार्थ्यांच्या आधुनिक पान २ वर

## पनवेल हिरानंदानीमधील घर रिकामे करण्यासाठी मराठी कुटूंबावर दबाव



**सा.रायगड लोकधारा वृत्त/पनवेल प्रतिनिधी :** खोलीचे करार संपल्यानंतरही घरात राहणाऱ्या एका मराठी कुटुंबाला त्या सोसायटीच्या चेअरमनकडून शिविगाळ केल्याचा दावा या मराठी कुटुंबियांकडून केला गेला आहे. मराठी माणसांची इथे राहण्याची लायकी नाही असं म्हणत शिविगाळ केली गेल्याचं या कुटुंबाचं म्हणणं आहे.पनवेलमधील भोकरपाडा भागातील हिरानंदानी सोसायटीत गायकवाड कुटूंब भाड्याने खोली घेऊन राहतात.त्यांचं कॉन्ट्रॅक्ट संपल्यावर ते दुसऱ्या रुमची शोधाशोध करत असल्याने त्यांनी त्या संदर्भात घर मालकाला कळवलं होतं, त्यांचं मुल लहान असल्याने घरमालकाने त्यांना राहण्याची परवानगी दिली होती, तरीही या सोसयाटीच्या महिला चेअरमनकडून रुम सोडण्यासाठी दबाव टाकला जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या वादात गायकवाड यांना हृदयाचा त्रास होऊ लागल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करावं लागले. या घटनेची माहिती मिळताच मनसेने जाब विचारला, मनसेच्या रायगड जिल्हाध्यक्ष अदिती सोनार व त्यांच्या कार्यकर्त्यांनी मराठी माणसांवर होत असलेल्या अरेरावीचा जाब विचारला.परिणामी चेअरमन वसुंधरा शर्मा महिलेने सर्वांचीच माफी मागितली आहे व यापुढे एकाही मराठी कुटुंब किंवा भाडेकरू कुटुंबांना त्रास देणार नाही याची कबुली दिली आहे. दरम्यान, या महिला चेअरमनने आतापर्यंत तीन ते चार मराठी कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले आहे, अशी माहिती मनसे पदाधिकाऱ्यांनी दिली.



# पुन्हा लढून जिंकून दाखवू

## आदित्य ठाकरेंचा ठाम आत्मविश्वास

**सा.रायगडलोकधारा वृत्त/मुंबई प्रतिनिधी :** गेली अडीच वर्षे शिवसेनेने गद्दारांशी संघर्ष केला. तत्पूर्वी सरकार असताना कोविड महामारीशी लढलो. महाराष्ट्र आणि मुंबईसाठी शिवसेना लढत राहील. कुणीही शिवसेना सोडून गेले तरी पर्वा नाही.आम्ही एकटे राहिलो तरी महाराष्ट्र पुढे कसा न्यायचा यावर पुन्हा लढू आणि जिंकून दाखवू, असा ठाम आत्मविश्वास शिवसेनेचे, आमदार आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केला.आदित्य ठाकरे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी शिवसेनेतून काही मंडळी मिंधे गटात जात आहेत त्यासंदर्भात यावेळी पत्रकारांनी आदित्य ठाकरे यांना विचारले. त्यावर ते स्पष्टपणे म्हणाले की, 'महानगरपालिका निवडणुकीपूर्वी निधीसाठी, पैशासाठी, स्वार्थासाठी किंवा गद्दारी करण्यासाठी अनेक लोक शिवसेना सोडून जातील. ज्यांना जायचेय त्यांना जाऊ द्या. शिवसेना हरणारी नाही. आम्ही महाराष्ट्र आणि मुंबईच्या भल्यासाठी लढतोय. गद्दारी करून जे पलीकडे जात आहेत ते त्यांच्या स्वार्थासाठी जात आहेत आणि मुंबई, महाराष्ट्राविरुद्ध गद्दारी करण्यासाठी जात आहेत.भाजपवाले निवडणूक झाल्यानंतर लाडकी बहीण व इतर अनेक योजना बंद करतील. शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली का? कर्जमाफी मिळालीच नाही. आता तर एक रुपयात पीक विमाही बंद करणार आहेत. अशी फसवणूक करून जनतेची मते मिळवतात. महाराष्ट्रातील जनता हे कदापि खपवून घेणार नाही, असा इशाराही यावेळी आदित्य ठाकरे यांनी दिला.निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने अनेक गोष्टी मोफत देण्याची आश्वासने दिली. मात्र, सरकार आल्यानंतर सगळी भाडेवाढ सुरू आहे. आता एसटी भाडेवाढ केली. बेस्टचीही भाडेवाढ करतील. आता मुंबईत पाण्याची भाडेवाढ करणार असल्याचे महापालिकेकडून ऐकतो आहे. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते; परंतु अद्याप दिलेले नाहीत असे सांगतानाच, पुढच्या सहा महिन्यांचे २१०० रुपये आताच द्या, अशी मागणीही आदित्य ठाकरे यांनी यावेळी केली.

पान १ वरून

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून दहावी आणि बारावीच्याविद्यार्थ्यांना शुभेच्छा..!

पहिले तीन आलेल्या विद्यार्थ्यांचे तसेच नमो चषक २०२५ स्पर्धेत १७ वर्षाखालील वयोगटातील विद्यालयाला चौथा क्रमांक मिळाल्याबद्दल विद्यार्थ्यांचा आणि क्रीडा शिक्षकांचा यावेळी सत्कार करण्यात आला. दरम्यान लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी चंद्रपूर येथे होणाऱ्या खुल्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या निखिल भोपी याचा संपूर्ण खर्च करण्याचा आश्वासन निखिलला दिले आहे तसेच विद्यालयासाठी १० स्मार्ट ब्लॅक बोर्ड उपलब्ध करून देणार आहेत. या कार्यक्रमा वेळी मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली. विद्यालयासाठी स्वच्छतागृह उपलब्ध करून देत सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम दुंदरे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रमेश पाटील यांनी केल्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे कौतुकही केले.

## लाखोंचा गैरव्यवहार

अधिकाऱ्यांकडे केली होती. ग्रामस्थांच्या तक्रारींची दखल घेऊन गटविकास अधिकाऱ्यांनी वैभव पाटील यांची चौकशी सुरू केली होती. या खातेनिहाय चौकशीत तीनही ग्रामपंचायतींमध्ये लाखो रुपयांचा अपहार झाल्याचे आढळून आले आहे. त्याची दखल घेऊन उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांनी उरण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची दखल घेऊन ग्रामविकास अधिकारी वैभव पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी तपास सुरू करण्यात आला असल्याची माहिती शेवा बंदर विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. विशाल नेहूल यांनी दिली आहे.

## बारमधील मारहाणीत तरूणाचा मृत्यू

गेले असता आरोपींनी त्यांनाही मारहाण केली. यात गंभीर जखमी झालेल्या हर्ष यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी बार व्यवस्थापक संतोष शेट्टी, वेटर शाहिद अन्सारी, पट्टस्वामी गौडा, भगवान सिंह, सुनील रवाणी, राजेश यादव, सोहेल हुसैन आणि अमर पाटील यांना अटक केली आहे.

## कर्मवीर विद्याप्रबोधिनी संचलित अनिवासी गुरुकुल प्रकल्पांतर्गत पारितोषिक वितरण समारंभ

तंत्रज्ञानावर आधारित शिक्षणासाठी बेनक्यू या कंपनीचा अत्याधुनिक इंटरॅक्टिव्ह बोर्ड विद्यालयास भेट देण्यात आला. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भाषणात शालेय जीवनातल्या आठवणी आणि काही प्रसंग तसेच विद्यालयाच्या जडणघडणीचा आढावा घेतला. तसेच विविध क्षेत्रात नैपुण्य प्राप्त केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख व स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत यांचेही भाषण झाले. दरम्यान सर्व विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण घेण्यास सुलभ होण्याच्या दृष्टिकोनातून विद्यालय व महाविद्यालयास १८ लाख रुपयांचे २० इंटरॅक्टीव्ह बोर्ड देण्याचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जाहीर केले. यावेळी विद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे व मंत्रमुग्ध करणारे नृत्य, नाट्य, गायन, पथनाट्य अशा विविध रंगी आणि वैविध्यपूर्ण आविष्कारांचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. या सोहळ्यास स्थानिक शाळा समितीचे सदस्य अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतच्या माजी सरपंच माई भोईर, माजी उपसरपंच विजय घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, प्राचार्या प्रणिता गोळे, ज्येष्ठ नेते जयवंत देशमुख, व्ही. के. ठाकूर, वामनशेठ म्हात्रे, भाऊ भोईर, मदन पाटील, वैभव घरत, पी. के ठाकूर, राम मोकल, राजेंद्र देशमुख, रघुनाथ देशमुख, किशोर पाटील, अंकुश ठाकूर, कुंदन मोकल, नामदेवराव ठाकूर, विधिज्ञ रुपेश म्हात्रे, कमलाकर देशमुख, शालिक भोईर, अनुसया घरत, चिंतामण गोंधळी, किरण म्हात्रे, प्रिया शिंदे, प्राचार्य गोवर्धन गोडगे, रविंद्र भोईर, प्रमोद कोळी, संदिप भोईर, बाबुलाल पाटोळे आदीं-सह पंचक्रोशीतील इतर मान्यवर नागरिक, पालक, विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जीवनदूत सन्मान



**सोगाव । जिल्हा वाहतूक रायगड शाखेतर्फे 'रस्ता सुरक्षा सप्ताह २०२५' निमित्ताने २४ जानेवारी रोजी अलिबाग तालुक्यातील आर.सी.एफ. सभागृह येथे झालेल्या कार्यक्रमात अपघातग्रस्तांना व नैसर्गिक आपत्ती काळात वेळोवेळी मदत करणाऱ्या पिंट्या गायकवाड मित्रमंडळ चोंढी व युवा एकता जनकल्याण सामाजिक संस्था चोंढी या संस्थेच्या स्वयंसेवकांचा रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते 'जीवनदूत सन्मान २०२५' हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.**

## गांजा विकणाऱ्या आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश



सा.रायगड लोकधारा वृत्त/

**कल्याण प्रतिनिधी :** कल्याण पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे यांनी परिमंडळ ३ कल्याण स्तरावर अवैध धंद्यावर कारवाई करण्याकरिता विशेष पोलीस पथक स्थापन केले असून या पथकाने गांजा अंमली पदार्थ विकणाऱ्या आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश केला आहे.डोंबिवली पोलीस स्टेशन व पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, कल्याण पथकाने दोन दिवसांत संयुक्तपणे केलेल्या कारवाई दरम्यान एकुण पाच लाख ९७,७८० रुपये किंमतीचा २९ किलो ९५५ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे.विशेष पथकातील पोलीस उपनिरीक्षक प्रसाद चव्हाण व पोलीस पथक गस्त करीत असताना आयरेगांव, डोंबिवली पूर्व येथे एक इसम सशयास्पदरित्या लपण्याचा प्रयत्न करित असताना, त्यास पळुन जाताना पकडले. या इसमाच्या ताब्यातील प्लास्टिकच्या पिशवीची झडती घेतली असता, त्यामध्ये सात किलो ६६ ग्रॅम वजनाचा एक लाख ४० हजार रुपये किमतीचा गांजा हा अंमली पदार्थ सापडला.डोंबिवली पूर्वेत राहणाऱ्या या आरोपीचे नाव किरण शहा असे असून त्याच्याविरुद्ध डोंबिवली पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करत त्याला गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. चोळेगांव तलाव, डोंबिवली पूर्व येथे सापळा लावुन थांबलेले असतांना, मध्य प्रदेश येथील सचिन मोरे व संजु लुहार हे दोन इसम आले. त्यांना थांबवुन, त्यांच्या बॅगेची झडती घेतली असता, या दोघांच्या बॅगेमध्ये २२ किलो, ८८९ ग्रॅम वजनाचा चार लाख ५७,७८० रुपये किमतीचा गांजा मिळून आला.

## उरण : जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धा



**उरण : प्रजासत्ताक दिनी विजय विकास सामाजिक संस्थेतर्फे बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल उरण येथे जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण १५० हुन अधिक स्पर्धकांनी भाग घेतला. यावेळी स्विमिंग पुलचे मॅनेजर व इतर मान्यवर उपस्थित होते.**

# बंद्यांसाठी उद्योजकता मार्गदर्शन शिबीर



**सा.रायगड लोकधारा वृत्त/**

**रसायनी वार्ताहर :** तळोजा मध्यवर्ती कारागृह येथील बंदी बांधवाकरिता व महानिरिक्षक कारागृह व जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अलिबाग रायगड यांच्यामार्फत बंद्यांकरिता गार्डनिंग व टु व्हिलर प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले.यावेळी प्रशिक्षणासंदर्भात माहिती विकास चव्हाण, प्रगती स्किल डेव्हलपमेंट सेंटर, पनवेलचे संस्थापक यांनी बंद्यांना कौशल्य आधारीत प्रशिक्षण उपलब्ध करुन रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही प्रगती स्किल डेव्हलपमेंट सेंटरमार्फत करण्यात येईल असे सांगितले. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या अमिता पवार यांनी या प्रशिक्षणाचा लाभ बंद्यांना मिळावा म्हणून ऑफ लाईन प्रशिक्षण देण्याची परवानगी मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला असता जिल्हाधिकारी यांनी तात्काळ मान्यता दिल्याने प्रशिक्षण वर्ग सुरु झाले आहेत. या कार्यक्रमाचे आभार कारागृहाचे अतिदक्षता अधीक्षक गोविंद राठोड यांनी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे अमिता पवार यांनी या कारागृहात कौशल्य आधारीत प्रशिक्षण वर्ग सुरु करण्याबाबत केलेल्या प्रयत्नाचे विशेष आभार मानले.तसेच प्रगती स्कील डेव्हलपमेंट सेंटर पनवेलचे विकास चव्हाण यांचेही आभार मानले व उत्तम प्रशिक्षण देण्यासाठी उत्तम प्रशिक्षक उपलब्ध करुन देण्याबाबत सूचीत करुन उपस्थिताचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक एन. आर. शिंदे यांनी केले. गार्डनिंग कम नर्सरी याचे प्रशिक्षण सोमवारी (दि.२७) सुरु करण्यात आले. प्रशिक्षण चालू होण्याकरिता कारागृह अधीक्षक प्रमोद वाघ, कारागृहाचे अतिरिक्त अधीक्षक गोविंद राठोड, कारागृह उपअधिक्षक महादेव पवार यावेळी अंतर्गत सुरक्षा अधिकारी राहुल झुटाळे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी सुनिल पाटील, शिक्षक एम. अधिकारी जी.व्ही. तागड यांनी विशेष प्रयत्न केले.

# क्रिकेटच्या लाकडी बॅटने मारहाण करून केले ठार

**सा.रायगड लोकधारा वृत्त/**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** क्रिकेटच्या लाकडी बॅटने चेहऱ्यावर आणि पाठीवर प्रहार करून जयेश वाघे याची हत्या केल्याप्रकरणी आरोपी मन्नू दिनेश शर्मा याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मृत जयेश हा पनवेल महानगरपालिका येथे मलनिसारण वाहनावर सफाईचे काम करत होता.२३ जानेवारी रोजी रात्री साडेनऊ ते पावणेदहाच्या दरम्यान क्रिकेट मैदानाच्या बाजूच्या रस्त्यावर आदिवासी वाडी, बेलपाडा, सेक्टर तीन खारघर येथे जयेश आणि त्याचे इतर मित्र हे चिकन बनवत होते. जयेश आणि मन्नू हे दोघेही मित्र आहेत. मन्नू यांच्याकडून चिकन साठी कोणतीही वर्गणी येत नाही, या कारणावरून जयेश आणि मन्नू यांच्यात वाद झाला आणि शिवीगाळ करण्यात आली. जयेशने मन्नू यांच्या कानाखाली मारली. याचा राग आल्याने मनु याने जयेशला हाताबुक्यांनी छातीत आणि पोटावर मारहाण केली आणि क्रिकेटच्या लाकडी बॅटने चेहऱ्यावर आणि पाठीवर प्रहार केले. यात जयेश हा गंभीर जखमी झाला. त्याला एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे दाखल करण्यात आले. २७ जानेवारी रोजी सकाळी सात वाजता त्याचा मृत्यू झाला.

# पाताळगंगा रसायनी मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ.अमित चव्हाण



**सा.रायगड लोकधारा वृत्त/रसायनी वार्ताहर :** पाताळगंगा रसायनी मेडिकल असोसिएशन वर्ष २०२५ चा पदग्रहण सोहळा ७६ व्या प्रजसत्ताक दिनाचे औचित्य साधून मॉटेरिया रिसॉर्ट येथे पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान ज्येष्ठ स्त्री रोग आणि प्रसूती तज्ञ डॉ.नीलकंठ फडके यांनी भूषवले. या कार्यक्रमात मागील वर्षीचे अध्यक्ष डॉ. विलास कुलकर्णी यांनी त्यांचा पदभार नवीन अध्यक्ष डॉ. अमित चव्हाण यांना देऊन शुभेच्छा दिल्या. डॉ. अमित चव्हाण यांनी २०२५ ची नवीन समितीची घोषणा केली. यामध्ये अध्यक्ष डॉ. अमित चव्हाण, उपाध्यक्ष डॉ. गजानन पाटील, सचिव डॉ. कुणाल कांबळे, खजिनदार डॉ. संजय त्रिम्बके, सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख डॉ. स्वाती कदम, शिबीर प्रमुख डॉ. श्रद्धा कुरंगळे, अकॅडमीक प्रमुख डॉ. निलेश साळुंके, क्रीडा प्रमुख डॉ. प्रतीक लोहार यांची विड करण्यात आली आहे.या पदग्रहण सोहळ्यात रसायनी परिसरातील सर्व डॉक्टर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रतिभा महिंद्रकर व संध्या कुलकर्णी यांनी केले.



# सानपाड्यात रंगला हळदीकुंकू समारंभ

**सा.रायगड लोकधारा वृत्त/नवी मुंबई प्रतिनिधी :**

नवी मुंबईतील सानपाडा सेक्टर ७ येथील गार्डन व्यू सोसायटीत वुमेन युनिटी ग्रुपतर्फे हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम सामाजिक कार्यकर्ते आबा जगताप यांच्या सहकार्याने पार पडला. यावेळी महिलांसाठी विविध कार्यक्रमाचे, खेळांचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी उत्सुर्त सहभाग नोंदवत कार्यक्रमाचा आनंद घेतला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी छाया म्हात्रे, मंजू यादव, प्रमिला टिपणवार, आशा कुलकर्णी, भावना शर्मा, श्रुती राठी, गीता जोशी तसेच इतर सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अनधिकृत ३५ झोपड्यांवर कारवाई

**सा.रायगड लोकधारा वृत्त/ पनवेल प्रतिनिधी :**



खारघर सेक्टर ३६ येथे अनधिकृत बांधकाम वाढले होते. यामध्ये साधारणपणे ३५ झोपड्यांचे बांधकाम झाले होते. यावर बुधवारी (दि.२९) दुपारी तीनच्या सुमारास मनोज घोडे पाटील (उपजिल्हाधिकारी व नियंत्रक अनाधिकृत बांधकाम) यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण ३५ झोपड्या पाडण्यात आल्या. या कामी एक जेसीबी, दोन ट्रक, तीन जीप, एक सुपरवायझर, दहा लेबर. पोलीस आणि सुरक्षा कर्मचारी यांच्यावतीने तोडक कारवाई करण्यात आली.याबाबत सिडकोचे उपजिल्हाधिकारी व नियंत्रक अनधिकृत बांधकाम मनोज घोडे पाटील यांनी सांगितले की खारघर हे शैक्षणिक हब आहे. तसेच हे शहर सुशिक्षित लोकांचे आहे. सध्या सिडको ने अनधिकृत झोपड्यावर, तसेच रस्त्यावर असणाऱ्या नर्सरीच्या नावाखाली ठाण मांडून बसलेल्या अनधिकृत नर्सरीच्या विरोधात विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. त्याचबरोबर आम्ही एखाद्या अतिक्रमणावर कारवाई केल्यानंतर, त्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होणार नाही, याकडे आम्ही जास्त लक्ष देत आहोत.

# एसटी भाडेवाढीविरोधात उबाठा आक्रमक

**सा.रायगड लोकधारा वृत्त/**

**रायगड प्रतिनिधी :** राज्य सरकारने लाडक्या बहिणींना १५०० रुपये देण्याची योजना जाहीर केली तर दुसरीकडे सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लावण्याचेही काम सुरू केले आहे. बुधवारी (दि.२९) रायगड जिल्ह्यातील पेण रामवाडी येथे शिवसेनेच्या ठाकरे पक्षाने जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांच्या नेतृत्वात चक्काजाम आंदोलन केले. पेण अलिबागमध्ये शिवसैनिक रस्त्यावर उतरले होते.एसटी भाडेवाढीविरोधात ठाकरे पक्ष आक्रमक झाला असून, ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पेण शहरातील विभागीय मध्यवर्ती बस स्थानकासमोर चक्काजाम आंदोलन केले व पेण विभागीय कार्यालयीन अधिकारी यांस निवेदन दिले. यावेळी जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे व संपर्क प्रमुख प्रसाद भोईर यांनी भाडेवाढ रद्द करा अन्यथा जनतेला न्याय मिळेपर्यंत आंदोलन करू असा इशारा पेण विभागीय परिवहन अधिकारी यांना दिला. आज जसे प्रवास भाडे वाढवले तसेच पुढे सर्व जीवनावश्यक वस्तूंचे भावदेखील हे सरकार वाढवणार, फसवी आश्वासने देवून निवडणुका लढवणार, दिलेली आश्वासने पूर्ण करून राज्य चालवणे शक्य नाही हे निदर्शनास आल्यानंतर आता भाडेवाढ करून सामान्य जनतेला हा भुर्दंड देण्याचा प्रयत्न हे सरकार करत आहे. आम्ही शिवसैनिक कधीच हे होवून देणार नाही असे देखील ते म्हणाले. यावेळी शिवसेना संपर्कप्रमुख प्रसाद भोईर, जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, युवा जिल्हा अधिकारी अमिर (पिंट्या) ठाकुर, जिल्हा समन्वयक नरेश गावंड, जिल्हा सल्लागार सतीश पाटील, समीर म्हात्रे, तालुका प्रमुख जगदीश ठाकुर, तालुका प्रमुख मुरुड नवशाद दळवी, महिला जिल्हा संघटिका दिपश्री पोटफोडे, विभाग प्रमुख मारुती भगत, गिरीश शेळके, प्रकाश पाटील, योगेश जुईकर, शशी गावंड, राकेश मोकल, योगेश पाटील, अचुत पाटिल, मेघना चव्हाण, वैशाली समेळ, दर्शना जवके, महानंदा तांडेल, वसंत म्हात्रे, हिराजी चौगुले आदी शिवसैनिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# १४ वर्षीय मुलीचे अश्लिल फोटो व्हायरल

## उलवे पोलिसांनी तरुणाला केली अटक



सा.रायगड लोकधारा वृत्त/

**पनवेल प्रतिनिधी :** उलवे परिसरात राहणाऱ्या २० वर्षीय तरुणाने १४ वर्षीय शाळकरी मुलीला धमकावून जबरदस्तीने तिचे अश्लिल फोटो काढून ते सोशल मिडीयावर व्हायरल केल्याचे उघडकीस आले आहे. हा तरुण पिडीत मुलीच्या शाळेजवळ गेला असताना, नागरिकांनी त्याला चोप देऊन पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. त्यानुसार उलवे पोलिसांनी या तरुणाला अटक केली आहे.या घटनेतील १४ वर्षीय पिडीत मुलगी आणि अटकेतील वुर्बान असलम शेख (२०) दोघेही उलवे परिसरात राहण्यात असून सदर मुलगी इयत्ता आठवीमध्ये शिक्षण घेत आहे. वुर्बान शेख मागील २ वर्षापासून पिडीत मुलीच्या मागे लागला होता. काही महिन्यापूर्वी त्याने सदर मुलीला आणि तिच्या वडिलांना मारण्याची धमकी देऊन त्याच्यासोबत प्रेमसंबंध ठेवण्यास जबरदस्ती केली. तसेच तिच्यासोबत जबरदस्तीने अर्धनग्न अवस्थेत फोटो काढले. या प्रकारानंतर घाबरलेल्या पिडीत मुलीने या तरुणासोबत दुरावा ठेवण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्याने तिचा पाठलाग करुन तिला त्रास देण्यास सुरुवात केली. त्यानंतर देखील पिडीतेने त्याला टाळण्यास सुरुवात केल्यानंतर या तरुणाने काही दिवसापूर्वी सदर मुलीचे अश्लिल फोटो इन्स्टाग्राम आणि फेसबुकवर व्हायरल केले. या प्रकाराची माहिती पिडीत मुलीला मिळाली होती. त्यानंतर वुर्बान सदर मुलीच्या शाळेजवळ तिचा पाठलाग करत गेला होता. यावेळी पिडीत मुलीने आरडाओरड केल्यानंतर त्याठिकाणी जमलेल्या नागरिकांनी वुर्बानला पकडून त्याला बेदम मारहाण केली. तसेच त्याला उलवे पोलिसांच्या स्वाधीन केले. त्यानंतर पोलिसांनी वुर्बान याच्या विरोधात पोक्सोसह आयटी ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली आहे.

## विद्यार्थिनींना स्वसंरक्षण प्रशिक्षणाचे धडे



**सा.रायगड लोकधारा वृत्त/अलिबाग वार्ताहर :** तालुक्यातील उसर येथील गेल इंडिया लिमिटेड यांच्यावतीने घोटवडे येथील मराठी शाळेतील विद्यार्थिनी व महिलांसाठी पाच दिवसीय मोफत स्वसंरक्षण स्वयंसिद्धा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याशिबिराचे मुख्य महाप्रबंधक अनुप गुप्ता, जितिन सक्सेना व शितल लाकरा यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन मुख्याध्यापिका रश्मी शिवलकर यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमाला आंतरराष्ट्रीय खेळाडू तथा प्रिझम संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी गोंधळी, विकास स्वयंसहायता समूह घोटवडे बचत गटाच्या अध्यक्षा सरिता शिंदे, मनीषा दिलीप शिंदे, विनायक भोनकर, रवीना शिंदे, मधुमती ठाकूर, सुजाता खंडागळे, भारती लोहार, सौम्या ठाकूर, उज्वला सांदणकर, मेघा शिंदे, स्वयंसिद्धा प्रशिक्षिका प्रणाली तळेगावकर, मनीषा माने, दिव्या शिंदे, निकी बेंडे व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

रायगड लोकधारा


## पनवेल महानगरपालिकेचा मालमत्ता कर न भरलेल्या

# थकबाकीदारांना जप्तीपूर्व नोटीसा, वॉरंट

सा.रायगड लोकधारा वृत्त/

**पनवेल प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिकेचा मालमत्ता कर न भरलेल्या थकबाकीदारांना जप्तीपूर्व नोटीसा व वॉरंट बजावण्यास पालिकेने सुरूवात केली आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार मालमत्ता कर विभागाच्या जप्ती पथकाच्या कर्मचाऱ्यांनी आजपर्यंत चारही प्रभागामध्ये एकूण ४४७ जप्तीपूर्व नोटीसांचे वाटप केले असून २७ वॉरंट बजावण्यात आले आहेत.महानगरपालिका क्षेत्रातील चारही प्रभागामधील सुमारे ३ लाख ५० हजार मालमत्तांना कर आकारणी करण्यात आली आहे. सध्याच्या आर्थिक वर्षामध्ये एप्रिल महिन्यापासून आजपर्यंत ३१४.५ कोटी इतकी वसुली झाली आहे.त्यानुसार मालमत्ता कर उपायुक्त व सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे व जप्ती पथकामधील अधिकारी, कर्मचारी यांनी त्यांच्या अधीनस्त असलेल्या सर्व मालमत्ताधारकांना प्रवृत्त करुन लवकरात लवकर महानगरपालिकेस मालमत्ता कराचा भरणा करून महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे . मालमत्ता कराचा भरणा न केल्यास जप्ती व अटकावणी कारवाई करण्यात येईल अशा सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२८ व अनुसूची ड प्रकरण ८ कराधान नियम ४७ अन्वये महानगरपालिकेस देय असलेल्या कराच्या थकबाकी पोटी जंगम स्थावर मालमत्ता जप्त अथवा अटकावणी करुन जाहिर लिलावाने विक्री करून थकबाकी महापालिकेच्यावतीने अटकावणीची कारवाई सुरू केल्यानंतर मालमत्ताधारकांनी कराचा भरणा करण्यास सुरुवात केली आहे. या कारवाई अंतर्गत प्रकाश फके यांच्या नेतृत्वातील खारघर वसुली पथकाने एका प्रसिद्ध मॉलकडून ८६ लक्ष रुपये वसूल करण्यात आले आहे.तसेच खारघरमधील एका प्रसिद्ध शिक्षण संस्थेकडून ४.६९ कोटी वसूल करण्यात आले आहे. वसूल करणेची तरतूद महानगरपालिकेस आहे. त्यानूसार नोटीस देऊनही मालमत्ता कराचा भरणा न केलेल्या थकबाकीदारांना उपायुक्त व सहाय्यक आयुक्त यांच्या सूचनेनूसार, कर अधीक्षक महेश गायकवाड व करअधीक्षक सुनिल भोईर यांच्या जप्ती पथकामार्फत खारघर, उपविभाग नावडे, कळंबोली कामोठे, पनवेल व नविन पनवेल प्रभागामधील थकबाकीदारांना जप्ती व अटकावणीची कारवाई करण्यात येत आहेत.महापालिकेच्या सर्व प्रस्तावित कामांसाठी मालमत्ता कर हा प्रमुख स्त्रोत आहे. मालमत्ता कर न भरल्यास त्याच्या शास्तीमध्ये प्रतिमहा २ टक्क्यांची वाढ होत असल्याने नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. महापालिकने मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी **"PMC TAX APP"** मोबाईल ॲप विकसित केले आहे. तसेच **www panvelmc.org** या वेबसाईटवर जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. मालमत्ताधारकांना काही शंका असल्यास १८००-५३२०-३४० या टोल फ्री क्रमांवरती संपर्क साधावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.



## ठाण्याच्या पाचपाखाडी परिसरातील इमारतीला आग

सा.रायगड लोकधारा वृत्त/

**ठाणे प्रतिनिधी :** पाचपाखाडीतील एका इमारतीच्या सातव्या मजल्यावरील डक्टला आग लागल्याची घटना मंगळवारी (दि. २८) घडली. इलेक्ट्रिक वायरिंगला आग लागल्याने धुराचे लोळ उठले. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून इमारतीत असलेल्या २० नागरिकांना बाहेर काढून त्यांची सुखरूप सुटका करण्यात आली. या घटनेत कुठलीही जीवितहानी झालेली नाही.मंगळवारी संध्याकाळी ४.४०च्या सुमारास ठाणे आपत्ती व्यवस्थापन विभागाला मिळालेल्या माहितीनुसार रायगड गल्ली, कचराळी तलावामागे, पाचपाखाडी, ठाणे (प.) या ठिकाणी तळ अधिक १५ माळ्याची इमारत आहे. या इमारतीत एकूण ६० सदनिका आहेत. इमारतीच्या आठव्या मजल्यावर इलेक्ट्रिक डक्टमध्ये वायरिंगला आग लागली होती. हळूहळू आग १५ व्या माळ्यापर्यंत डक्टमार्गे पसरली आणि धुराचे लोळ उठले.आग शॉर्टसर्किटने लागल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात येत आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, विजय चंद्रकांत गायकर यांनी रोशन प्रिंटर्स, शॉप नं.०४ / ०५, प्रकाश निवास, प्लॉट नं.१३४/ ०१, आगरी समाज हॉल जवळ, पनवेल, रायगड महाराष्ट्र - ४१० २०६ येथे छापून मु. पो. पोयंजे, ता. पनवेल , जि. रायगड, महाराष्ट्र - ४१० २०६ येथून प्रकाशित केले. लेखांतून व्यक्त होणाऱ्या मतांशी संपादक सहमत असतीलचं असे नाही. सर्व वाद पनवेल न्याय कक्षेत. ( ८३६९३९४३७२ / ९१३६५३९५६० ) / Facebook :- vijay gaikar / Whatsapp No. ९१३६५३९५६० /
संपादक : विजय चंद्रकांत गायकर
Email Id :- Gaikarvijay26@gmail.com
RNI No. MAHMAR/2013/48622